# प्रेसनोट दिनांक ०७/०४/२०१९

## मार्केटयार्ड पोलीस स्टेशन, पुणे शहर

## २० वर्षापासुन चोरीच्या गुन्हयातील फरारी आरोपी मार्केटयार्ड पोलीसांकडुन अटक

---

सन २०१९ लोकसभा सार्वत्रिक निवडणुक व गुढी पाडवा सणानिमित्त मार्केटयार्ड पोलीस ठाणे हददीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संभाजी निंबाळकर यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे आंबेडकरनगर वसाहत परिसरात तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री.सुभाष महाले पो.ना ६५१२ विशाल वारूळे,पो.ना ६५५५ वामन पडळकर यांचेसह गस्त करीत असताना एक इसम संशयितरित्या मिळुन आल्याने त्यास मार्केटयार्ड पोलीस ठाणे पुणे येथे आणुन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नांव राजेश मोतीलाल सरोज,रा.स.नं.५७०,आंबेडकरनगर, मार्केटयार्ड पुणे असे सांगुन सदरच्या इसमाचा अभिलेख तपासला असता तो स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं-२०६/२००० भा.द.वि कलम-४६१,३८०,३४ या चोरीच्या गुन्हयात गेल्या २० वर्षापासुन फरारी होता त्यास पुढील तपास कामी स्वारगेट पोलीस ठाणेकडे ताब्यात देवून स्वारगेट पोलीस पुढील कारवाई करत आहेत.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त झोन ५ श्री.प्रकाश गायकवाड,सहा.पोलीस आयुक्त श्री.मिलींद पाटील वानवडी विभाग वरिष्ठ पोलीस निरीक्षक मार्केटयार्ड पोलीस ठाणे श्री संभाजी निंबाळकर यांचे मार्गदर्शना खाली करण्यात आलेली आहे.